# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **बैठक क्रमांक** | : | 191 |
| **स्थळ** | : | Online Meeting App |
| **वार व दिनांक** | : | सोमवार दि. 15 जानेवारी 2024 |
| **वेळ** | : | दुपारी 4.30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## (महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.191 (Online ), सोमवार दि. 15 जानेवारी 2024 दुपारी 4.30 वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू | | अध्यक्ष |
| 2. मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्र. कुलगुरू | | सदस्य |
| 3. मा. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली | - Online | सदस्य |
| 4. मा. डॉ. दिगंबर शिर्के, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | - Online | सदस्य |
| 5. मा.डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे | | सदस्य |
| 6. मा. डॉ. जयदिप निकम, नाशिक | | सदस्य |
| 7. मा. डॉ. केशव तुपे, मा. संचालक उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी | | सदस्य |
| 8. मा. डॉ. संजय चोरडिया, पुणे | - Online | सदस्य |
| 9. मा.श्री. भटूप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक (निमंत्रित) | | सदस्य |
| 10. डॉ.प्रकाश देशमुख, कुलसचिव (प्र.) | | सचिव |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | |
|---|---|
| 1. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 2. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 3. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 4. मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण | सदस्य |
| 5. मा. संचालक, तंत्रशिक्षण,मंबई | सदस्य |
| 6. मा. श्री. उदित शेठ, मुंबई | सदस्य |

| क्र. | ठराव क्र, | तपशील |
|---|---|---|
| 191.1.0 | 191.1.0 | **स्वागत –**<br>बैठकीच्या सुरुवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. |
| | 191.1.1 | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुलसचिव पदासाठी विहित प्रक्रियेद्वारे निवडसमितीची शिफारस मान्यतेसाठी**<br>कुलगुरू यांनी उपस्थित सदस्यांना कुलसचिव पदासाठी जाहीरातीस मान्यता दिल्यानंतर, विहित प्रक्रिया कशी राबविली, याबाबत माहिती दिली. सादरीकरणात पुढील बाबींचा उल्लेख करण्यात आला<br>• दि. ११ ऑगस्ट २०२३ रोजी कुलसचिव पदासाठी जाहिरात वृत्तपत्रात तसेच |

विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली होती.

- विद्यापीठात अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत देण्यात आली होती.
- सदरच्या जाहिरातीतून अंतिम दिनांकापर्यंत कुलसचिव पदासाठी एकूण ५३ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले.
- दि. २५ सप्टेंबर २०२३ रोजी छाननी समितीची बैठक झाली, त्यातुन कुलसचिव पदाच्या मुलाखतीसाठी एकूण ३३ उमेदवारांना पात्र करण्यात आले.
- छाननी समितीच्या शिफारशीस मा. कुलगुरु यांचे मान्यतेनंतर दि. २८ डिसेंबर २०२३ रोजी ३३ पात्र उमेदवारांना मुलाखत पत्र पाठविण्यात आली.
- विद्यापीठ कायदा कलम १२ च्या परिनियमान्वये नमूद केल्याप्रमाणे मा.कुलगुरु यांचे मान्यतेने निवड समितीचे गठन करण्यात आले.
- दि. १५ जानेवारी २०२४ रोजी कुलसचिव पदाच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यासाठी निवड समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले, निवडसमितीसमोर एकुण पात्र ३३ उमेदवारांपैकी १६ उमेदवार प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित होते.
- मुलाखत घेतांना उमेदवारांचे मुल्यमापन करण्यासाठी गुणांकन पद्धतीने मुल्यांकन करण्यात आले. निवडसमिती सदस्यांचे मुल्यांकन स्वतंत्ररित्या गुणांकन पध्दतीने तयार करुन त्यानंतर एकत्रित गुणतक्ता तक्ता तयार करण्यात आला,त्यानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात आली.
- गुणवत्ता यादीतील सर्वात जास्त गुणवत्ता प्राप्त करणा-या उमेदवारास मिळालेल्या गुणानुसार निवड समितीचा अहवाल तयार करण्यात आला.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – वरील विषयाबाबत कुलगुरू यांनी उपरोक्त सादर केलेल्याप्रमाणे कुलसचिव पदासाठी श्री. दिलीप भास्करराव भरड, यांच्या निवडीची निवड समितीने केलेली शिफारस सर्वानुमते मान्य करण्यात आली.

सचिव
व्यवस्थापन मंडळ

15/1/24
अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ